लोकमत

## महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

http://trti.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या ४०० उमेदवारांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या PSI, STI, ASO ई. तत्सम पदांकरिता स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण तयारीसाठी महाराष्ट्र येथे अनिवासी प्रशिक्षण देणे योजनेसाठी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्याबाबत..**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे ही एक नोंदणीकृत स्वायत्त संस्था आहे. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत अनुसूचित जमातीच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाकरिता विविध प्रकल्प, योजना राबविल्या जातात. तसेच अनुसूचित जमातीतील युवक आणि युवतींकरिता विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात. महाराष्ट्र राज्यातील एकूण ४०० उमेदवारांना Police Sub Inspector (PSI), Sales Tax Inspector (STI), Assistant Section Officer (ASO) या पदांच्या प्रशिक्षण तयारीकरिता अनिवासी स्पर्धा परीक्षा पूर्व मार्गदर्शन देऊन शासकीय नोकरीची संधी मिळावी म्हणून खाजगी नामांकित व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देणेसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन स्वरूपात अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर योजनेचा सविस्तर तपशील, शासन निर्णय आवश्यक कागदपत्रे इ. बाबतच्या अधिक माहितीकरिता या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ https://mahatenders.gov.in ला भेट देऊन या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरूनच ऑनलाईन स्वरूपात अर्ज करावेत. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी निवड ही सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test - CET) द्वारे गुणांकन पद्धतीने करण्यात येणार आहे.

अनुसूचित जमातीतील उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार व CET मधील प्राप्त गुणानुसार निवड करण्याचे अंतिम अधिकार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे राहतील.

स्वा/-
(डॉ. राजेंद्र भारूड, भा.प्र.से.)
आयुक्त,

[Dgipr No. 2024-25/क्र.5/C-256]

Chhatrapati Sambhajinagar Main
Page No. 9 Jun 18, 2024
Powered by: erelego.com